नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ८० Issue - 80 | वार बुधवार दि. ६ ऑगस्ट २०२५३ Blow- Wednesday Date 6 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com




# झेडपी, महापालिका, नगरपालिकांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅट मशिन नसणार

## राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांची नाशिकमध्ये आढावा बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सर्वच राजकीय पक्ष आणि नागरिकांनाही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहे. त्याच अनुषंगाने निवडणूक आयोगानेही तयारी सुरू केली असून राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज नाशिक जिल्ह्यात जाऊन आढावा घेतला. नाशिक विभागाअंतर्गत जेवढे जिल्हे येतात, त्यातील मनपा, झेडपी आणि नगरपालिका यांच्या निवडणुकांचा आढावा घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाध साधला. यावेळी, आगामी निवडणुकांची माहिति दिली. त्यामध्ये, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट मशिन नसणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील ४ महिन्यात घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यासाठी, मतदान केंद्राची संख्या निश्चित करणे, मतदान यंत्राची व्यवस्था करणे, निवडणुकांसाठी आवश्यक असणाऱ्या अधिकारी कर्मचारी संख्याचा आढावा घेण्यासाठी निवडणूक आयुक्तांनी आज नाशिक दौरा केला. यावेळी, आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने माहितीही दिली. नाशिक विभागात ५० लाख ४५ हजार मतदार आहेत, ४ हजार ९८२ मतदान केंद्र, त्यासाठी ८ हजार ७०५ कँट्रोल युनिट लागणार असून १७ हजार मतदान यंत्रांची गरज भासणार असल्याचं त्यांनी म्हटलं. तसेच, दिवाळीनंतरच निवडणुकांचा बिगुल वाजेल, असेही त्यांनी सांगितले. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅट मशिन नसणार आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.



स्थानिक स्वराज्य संस्थांचे सर्व इलेक्शन एकत्रित करणेसाठी मनुष्यबळ कमी पडेल. त्यामुळे टप्याटप्याने निवडणुका घेतल्या जाणार आहेत. पण पहिले कोणते इलेक्शन होईल ते अद्याप निश्चित नाही. ऑक्टोबर अखेरनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रकियेला सुरुवात होईल. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक साठी ाींं- रिंं मशिन राहणार नाही, अशी माहिती निवडणूक आयुक्तांनी दिली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट नसेल हा निवडणूक आयोगाचा निर्णय नुसता तुघलकीच नाही तर एकूण निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह ला- वणारा आहे, असे मत शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी व्यक्त केलं आहे. तसेच, व्हीव्हीपॅट गायब करण्यापेक्षा औपचारिकता म्हणून निवडणुकीचा जो फार्स करत आहात तो फार्स न केलेला बरा, असेही त्यांनी म्हटले.

दरम्यान, भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभेच्या २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर करण्यात आलेल्या ईव्हीएम तपासणी व पडताळणी प्रक्रियेत सर्व यंत्रे योग्य स्थितीत असल्याचे स्पष्ट केले आहे. आयोगाच्या १७ जून २०२५ च्या सूचनांनुसार, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी १० उम ेदवारांच्या विनंतीनुसार १० विधानसभा मतदारसंघांमधील मतदार युनिट, नियंत्रण यंत्र व व्हीव्हीपॅट यांची तपासणी केली. सर्व यंत्रांनी निदान चाचण्या उत्तीर्ण केल्या व व्हीव्हीपॅट स्लिप आणि ईव्हीएम निकालात कोणताही फरक आढळला नाही.

# ढगफुटीसारख्या अस्मानी संकटामुळे उत्तर काशीतील धारली गावच वाहून गेले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डेहराडून : उत्तराखंडच्या उत्तरकाशीमध्ये निसर्गाचे आक्राळविक्राळ रुप पाहायला मिळत आहे. ढगफुटीसारख्या अस्मानी संकटामुळे संपूर्ण धारली गावच वाहून गेले आहे. आता हर्षिल येथील भारतीय लष्कराच्या छावणीलाही याचा तडाखा बसला आहे. धारली गावातील प्रलयानंतर १० मि निटांच्या वेळेतच लष्कराचे पथक तेथे पोहोचले आणि तातडीने बचावकार्य सुरु केले. लष्कराच्या पथकाला २० गावकऱ्यांना तरी जीवघेण्या प्रलयातून वाचवण्यास यश आले. पण दुसरीकडे मात्र हर्षिल आर्मी कॅम्प परिसरात ढगफ ुटी झाल्यानंतर ८ ते १० सैनिक बेपत्या झाल्याचे वृत्त समोर आले आहे.

भारतीय लष्कराचे ब्रिगेड कमांडर ब्रिगेडियर मनदीप ढिल्लन यांनी माहिती दिली की, दुप- ारी १:४५ वाजता धारली गा- वात ढगफुटीमुळे ही दुर्घटना घडली. हे गाव हर्षितच्या उत्तरेस सुमारे ४ किमी अंतरावर आहे आणि गंगोत्रीच्या मार्गावर आहे. भारतीय लष्कर हर्षिलमध्ये तैनात आहे आणि सैनिकांनी १० मिनिटांत धारली गावात पोहोचत बचावकार्य सुरू केले.

ढिल्लन असेही म्हणाले की, सुमारे १५० सैनिक, विशेष वैद्यकीय उपकरणे, बचाव उपकरणे आणि डॉक्टर बचाव कार्यासाठी तैनात करण्यात आले आहेत. पण यातत हर्षिल येथील लष्करी छावणीत ढगफ ुटी झाली, परंतु लष्कर या परिस्थितीचा सामना करत आहे. नागरिकांच्या मदत आणि बचाव कार्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करत आहे.

दरम्यान, या आपत्कालीन परिस्थितीसाठी भारतीय हवाई दलाचे हेलिकॉप्टर देखील सज्ज आहेत. सारसव, चंदीगड आणि बरेली हवाई तळांवरून २ चिनूक, २ एमआय-१७व्ही५, २ चित्ता आणि एक एएलएच बचाव कार्यासाठी तैनात आहेत. सध्या हवामानातील अनिश्चिततेम ुळे हेलिकॉप्टर उड्डाण करू शकत नाहीत. हवाई दलाचे हेलिकॉप्टर त्यांच्या तळांवरून हर्षिल येथे जातील आणि नंतर गरजेनुसार बचाव कार्यात गुंततील.

हर्षिल आर्मी कॅम्पचा एक व्हायरल व्हिडिओ समोर आला आहे. त्यामध्ये प्रलयकारी दृश्य दिसत आहे. व्हिडिओमध्ये असे दिसून येते की जवळजवळ संपूर्ण छावणीचे दगड पाण्याच्या प्रवाहाने वाहून गेले आहेत. सैनिकांपासून ते इतर स्तरांपर्यंत या छावणींचे किती नुकसान झाले आहे, याबाबत अद्याप कळू शकलेले नाही. यातच एक व्यक्ती नदीच्या काठावर असलेल्या जोरदार प्रवाहांचा व्हिडिओ बनवताना दिसत आहे.

दुसऱ्या व्हिडिओमध्ये असे दिसून येते की, एक सैनिक घाबरलेल्या अवस्थेत व्हिडिओ शूट करत आहे. व्हिडिओमध्ये असे सांगितले जात आहे की, भागिरथी नदीने पाण्याची पातळी ओलांडली आहे. लष्कराची छावणी पूर्णपणे पाण्यात बुडाली आहे. नदीकाठच्या मुलांना आणि लोकांना बाहेर काढण्याचे पूर्णपणे प्रयत्न केले जात आहे. तसेच, पाण्या वेगाबद्दल सूचक इशारा देण्यात येत आहे.

# राज्य शासनही सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करणार : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नांदणी मठातील (ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) माधुरी हत्तीण पुन्हा नांदणीत यावी, अशी जन भावना आहे. ही जनभावना लक्षात घेऊन नांदणी मठाने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी. राज्य शासनही स्वतंत्र पुनर्विचार याचिका दाखल करून सर्वो च्च न्यायालयात हत्तीणीला परत देण्यासंदर्भात भूमिका मांडेल, असे सांगून याप्रकरणी राज्य शासन पूर्णपणे मठाच्या पाठीशी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नांदणी मठ (ता. शिरोळ, जिल्हा कोल्हापूर) येथील माध- ुरी ऊर्फ महादेवी हत्तीणीच्या प्रश्नासंदर्भात मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी राज्य शासनाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, वन मंत्री गणेश नाईक, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह नांदणी म ठाचे प्रतिनिधी तसेच लोकप्रतिनिधी उप- स्थित होते. नांदणी मठाच्या परंपरा आणि स्थानिक जनतेच्या भावनांचा विचार करून कायदेशीर प्रक्रिया मार्गाने माधुरी ऊर्फ महादेवी हत्तीणीला पुन्हा मठात परत आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, गेल्या ३४ वर्षांपासून माधुरी हत्तीण नांदणी मठात आहे. माधुरी पुन्हा मठात यावी ही जन भावना आहे. ही जन भावना लक्षात घेऊन राज्य शासन पुनर्विचार याचिका दाखल करेल. मठानेही आपल्या याचिकेमध्ये राज्य शासनाचाही समावेश करावा. तसेच वन विभागाच्या वती- ने सर्वोच्च न्यायालयात स्वतंत्र सविस्तर भूमिका मांडण्यात येईल. यामध्ये केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाच्या निकषाप्रम ाणे व उच्चस्तरीय समितीने सुचविलेल्या सर्व मुद्द्यांचे निराकरण करण्यात येईल.

ट्रम्प यांच्या टॅरिफच्या इशाऱ्यानंतर रशिया भारताच्या बाजूने मैदानात


डोनाल्ड ट्रम्प यांची भारताला धमकी

# आमच्या व्यापारी भागीदारांवर दबाव टाकू नका, आम्ही धमकी समजू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत रशियासोबत व्यापार करत असल्यानं टॅरिफ वाढवण्याचा इशारा दिला आहे. २४ तासात भारतावरील टॅरिफ वाढवणार असल्याचा इशारा देखील त्यांनी दिला आहे. अमेरिकेकडून रशियासोबतचा व्यापार इतर देशांनी थांबवावा यासाठी दबाव टाकला जात आहे. रशियाच्या क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव यांनी म्हटलं मॉस्को विरोधातील धमक्या बेकायदेशीर आहेत. देशांना त्यांचा व्यापारी भागीदार कोण आहे हे निवडण्यासाठी दबाव टाकला जाऊ शकत नाही, असं म्हटलं.

क्रेमलिनचे प्रवक्ते, दिमित्री पेस्कोव यांनी म्हटलं की देशांना त्यांचा व्यापारी भागीदार निवडण्याचा अधिकार आहे, त्यांना अशा प्रकारच्या धमक्या दिल्या जाऊशकत नाहीत. कोणत्याही देशाला रशियासोबतचा व्यापार बंद करण्यास भाग पाडणं अवैध आहे. रशियाच्या व्यापारी भागीदारांवर दबाव टाकणं धमकी समजली जाईल, अशी पेस्कोव म्हणाले.



दिमित्री पेस्कोव यांनी म्हटलं की आमचं मत आहे की सार्वभौम देशांना आपले व्यापारी भागीद- ार, व्यापार, आणि आर्थिक सहकार्य यासाठी भागीदार निवडण्याचा अधिकार असतो, वास्तवात असंच असतं. देशांना आपल्यासाठी व्यापार आणि आर्थिक सहकार्याच्या शक्यता निवडण्याचा अधिकार देशहिताच्या बाबत असेल.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला २४ तासात टॅरिफ वाढवण्याची धमकी दिली आहे. भारतानं रशियाकडून तेल आणि इतर लष्करी शस्त्र खरेदी करणं थांबवलं नाही तर टॅरिफ वाढवणार असल्याची धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. काल ट्रम्प यांनी एक पोस्ट करत म्हटलं होतं की भारत फक्त रशियाकडून मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी करत नाही तर खरेदी केलेल्या तेलापैकी एक हिस्सा खुल्या बाजारात विकून नफा कमवत आहे. रशियाकडून युद्ध सुरु असताना यूक्रेनमध्ये किती लोक मारले जात आहेत याची पर्वा भारताला नाही, त्यामुळं टॅरिफ वाढवत असल्याचं ट्रम्प म्हणाले.

**भारताला निशाणा करणं चुकीचं**

डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमकीवजा इशाऱ्यानंतर भारतानं उत्तर दिलं आहे. विदेश मंत्रालयानं उत्तर देत म्हटलं की भारताला निशाणा बनवणं अयोग्य आणि दुहेरी भूमिकेच उदाहरण आहे. भारत एक मोठी अर्थव्यवस्था असून राष्ट्रहितासाठी आर्थिक सुरक्षा आणि रक्षणसाठी आवश्यक ती पावलं उच- लणार आहे.

## संपादकीय....

### व्यापाऱ्यांवर दबाव नको

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला २४ तासात टॅरिफ वाढवण्याची धमकी दिली आहे. भारतानं रशियाकडून तेल आणि इतर लष्करी शस्त्र खरेदी करणं थांबवलं नाही तर टॅरिफ वाढवणार असल्याची धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. काल ट्रम्प यांनी एक पोस्ट करत म्हटलं होतं की भारत फक्त रशियाकडून मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी करत नाही तर खरेदी केलेल्या तेलापैकी एक हिस्सा खुल्या बाजारात विकून नफा कमवत आहे. रशियाकडून युद्ध सुरु असताना यूक्रेनमध्ये किती लोक मारले जात आहेत याची पर्वा भारताला नाही, त्यामुळं टॅरिफ वाढवत असल्याचं ट्रम्प म्हणाले. डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमकीवजा इशाऱ्यानंतर भारतानं उत्तर दिलं आहे. विदेश मंत्रालयानं उत्तर देत म्हटलं की भारताला निशाणा बनवणं अयोग्य आणि दुहेरी भूमिकेच उदाहरण आहे. भारत एक मोठी अर्थव्यवस्था असून राष्ट्रहितासाठी आर्थिक सुरक्षा आणि रक्षणसाठी आवश्यक ती पावलं उचलणार आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत रशियासोबत व्यापार करत असल्यानं टॅरिफ वाढवण्याचा इशारा दिला आहे. २४ तासात भारतावरील टॅरिफ वाढवणार असल्याचा इशारा देखील त्यांनी दिला आहे. अमेरिकेकडून रशियासोबतचा व्यापार इतर देशांनी थांबवावा यासाठी दबाव टाकला जात आहे. रशियाच्या क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव यांनी म्हटलं मॉस्को विरोधातील धमक्या बेकायदेशीर आहेत. देशांना त्यांचा व्यापारी भागीदार कोण आहे हे निवडण्यासाठी दबाव टाकला जाऊ शकत नाही, असं म्हटलं. क्रेमलिनचे प्रवक्ते, दिमित्री पेस्कोव यांनी म्हटलं की देशांना त्यांचा व्यापारी भागीदार निवडण्याचा अधिकार आहे, त्यांना अशा प्रकारच्या धमक्या दिल्या जाऊशकत नाहीत. कोणत्याही देशाला रशियासोबतचा व्यापार बंद करण्यास भाग पाडणं अवैध आहे. रशियाच्या व्यापारी भागीदारांवर दबाव टाकणं धमकी समजली जाईल, अशी पेस्कोव म्हणाले. रशियाच्या दिमित्री पेस्कोव यांनी म्हटलं की आमचं मत आहे की सार्वभौम देशांना आपले व्यापारी भागीदार, व्यापार, आणि आर्थिक सहकार्य यासाठी भागीदार निवडण्याचा अधिकार असतो, वास्तवात असंच असतं. देशांना आपल्यासाठी व्यापार आणि आर्थिक सहकार्याच्या शक्यता निवडण्याचा अधिकार देशहिताच्या बाबत असेल.

# जिल्हा परिषद परिचर महासंघ व युवा भिम सेनेचे ठिय्या आंदोलन संपन्न





लातूर प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : जिल्हा परिषद महिला परिचर हे कित्येक दशकांपासून आपल्या न्याय व हक्कासाठी लढा देत आल्या आहेत.परंन्तू शासन दरबारी यांची कसलीच दखल घेतली जात नाही.तीन हजार रुपये देऊन त्यांना पूर्ण वेळ काम करायला भाग पाडले जाते.यांना कायम वेतनवर रूजू करण्यात यावे.तसेच भाऊबीज मिळावी,तीन वर्षेपासुन गणवेश नाही तरी तीन वर्षाचे गणवेश मिळावे. किमान वेतन २१०००/- मिळावे इत्यादी मागण्यांसाठी जि.प.लातूर येथे महिलांनी तसेच युवा भिम सेनेच्या कार्यकर्त्यांनी ठिय्या आंदोलन केले.यावेळी युवा भिम सेनेचे संस्थापक अध्यक्ष पंकज भाऊ काटे, प्रवक्ते सुफी सय्यद शमशोद्दीन, महेबुब भाई सय्यद, महिला जिल्हाध्यक्षा उमाताई आदमाने, युवा जिल्हाध्यक्ष शेखर कांबळे, निलेश मस्के, गणेश पोटभरे, रोहन रायभोळे, महेंद्र मोरे, शिरीष मांदळे, संघाच्या जिल्हाध्यक्षा संगीता गवळी,सुवर्णा कळसे, सविता कांबळे नम्रता गरड, संगीता घोलप, वंदना फुले, साजिदा पठाण, अयोध्या चोले, सुरेखा केसाळे,शिवकांता गायकवाड ,अर्चना कांबळे,मंदोदरी हांडे, भाग्यश्री विरकर, इ. पदाधिकारी व शेकडो परिचर उपस्थित होत्या.यावेळी सि.ओ. साहेबांनी आपले मागणे शासन दरबारी जिम्मेदारीने पाठविण्याचे आश्वासन दिले.

# शिर्डीतील साईबाबा संस्थानाच्या वतीने डॉ. विश्वासराव आरोटे यांचा सत्कार!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



शिर्डी (प्रतिनिधी) - जगातील कोट्यवधी भाविक भक्तांचे आराध्य दैवत असलेल्या शिर्डीतील साईबाबांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेण्याचा मान दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे आणि दैनिक समर्थ गांवकरी चे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर व पत्रकार पंढरीनाथ पगार यांना नुकताच लाभला. भाविकतेने ओथंबलेल्या वातावरणात झालेल्या या भेटीत साईबाबांच्या चरणी नतमस्तक होत त्यांनी समाधीस्थळाचा पवित्र अनुभव घेतला.

या भेटीच्या निमित्ताने शिर्डी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी डॉ. विश्वासराव आरोटे आणि संजय फुलसुंदर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. या सन्मानाने उपस्थित भाविकांसह पत्रकार बांधवांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमादरम्यान गोरक्ष गाडीलकर यांनी दैनिक समर्थ गांवकरी या वर्तमानपत्राच्या प्रामाणिक, निर्भीड आणि लोकहितार्थ पत्रकारितेची प्रशंसा केली. डॉ. विश्वासराव आरोटे यांनी राज्यातील पत्रकार संघटनांच्या बळकटीकरणासाठी, तसेच ग्रामीण भागातील जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या कार्याचा गौरव करण्यात आला. तसेच, संजय फुलसुंदर यांनी प्रशासनिक व व्यवस्थापन क्षेत्रात दिलेल्या योगदानाचीही दखल घेण्यात आली.

साईबाबांच्या दर्शनानंतर झालेल्या या सत्कार सोहळ्यात श्रद्धा, सबुरी आणि सेवाभावाचा संदेश जणू प्रत्यक्ष अनुभूतीस आला. उपस्थितांनी या प्रसंगाचे स्मरणीय क्षण छायाचित्रांत कैद करत, समाधीस्थळाच्या आध्यात्मिक वातावरणात मन:शांतीचा अनुभव घेतला.

सत्कार कार्यक्रमामुळे साईभक्त आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांमध्ये परस्पर आदर, प्रेरणा आणि समाजसेवेचा नवा संकल्प जागृत झाला.



# पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने माजी वसुंधरा अभियानास प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी

नगरपरिषद पंढरपूर करिता हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र या अभियानांतर्गत बत्तीस हजार पाचशे वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यानुसार हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र व माजी वसुंधरा या अभियानांतर्गत पंढरपूर नगरपरिषदेने वृक्ष लागवडीचा संकल्प करून वृक्षारोपण अभियानास सुरुवात केली आहे.

या अभियानांतर्गत दिनांक ०१/०८/२०२५ रोजी पंढरपूर शहरातील पद्मावती उद्यान कॉर्नर ते बडोदा बँक स्टेशन रोड येथील रस्ता दुभाजकांमध्ये वृक्ष लागवड करण्यात आली. मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत पंढरपूर शहरांमध्ये विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्याचे नियोजन केले आहे. यावेळी मुख्याधिकारी महेश रोकडे, उपमुख्य अधिकारी रवींद्र सूर्यवंशी, नगर अभियंता प्रकाश केसकर, अभियंता राजकुमार काळे, लेखपाल हरून शेळके, लेखापरीक्षक प्रशांत पवार, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, उपनगर अभियंता सुमित पाटील, भंडारे विभाग प्रमुख विजय शहाणे, स्वच्छता निरीक्षक नाना गोरे, उद्या विभाग प्रमुख सुवर्ण हाके,

# राज्य शासनाकडून शिरोळ तहसिलदारांचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : शिरोळ येथील तहसील कार्यालयाचे आदर्श व कर्तव्यदक्ष तहसीलदार मा अनिलकुमार हेळकर (साहेब) यांना राज्य शासनाने कोल्हापूर जिल्ह्यातून आदर्श तहसीलदार पुरस्कार देऊन गौरव केला आहे.

या अभिनंदनीय निवडीबद्दल आदरणीय हेळकर (सर ) यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# सोलापूर जिल्हा रेड रन स्पर्धेचे विजेते, करणार राज्य स्पर्धेत सोलापूरचे नेतृत्व

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त जिल्हास्तरीय रेड रिबन क्लबच्या विद्यार्थ्यांची रेड रन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

ही स्पर्धा मुले व मुली अशा दोन गटात स्वतंत्र घेण्यात आली. ही स्पर्धा पाच किलोमीटरची घेण्यात आली. दयानंद कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी व फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन.बी. तेली यांनी हिरवा झेंडा दाखवून रेड रन स्पर्धेचे उदघाटन केले.

रेड रन या स्पर्धेतून मुलांमधून प्रथम, द्वितीय व तृतीय तर मुलींमधून देखील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते मुलांमधून स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेल्या करण सुधाकर रोकडेला रू. २०००/- रोख, मेडल, मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक आलेल्या यश श्रीकांत खटकेला रू. १५००/- रोख, मेडल, मानचिन्ह व प्रमाणपत्र तर तृतीय क्रमांक आलेल्या बजरंग क्रिपाल सिंग कतारी याला रू. १०००/- रोख, मेडल, मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

मुलींमधून स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेल्या सुकेशनी केरबा येरवडेला रू. २०००/- रोख, मेडल, मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक आलेल्या वर्षा भिमराव राठोडला रू. १५००/- रोख, मेडल, मानचिन्ह व प्रमाणपत्र तर तृतीय क्रमांक आलेल्या वसुंधरा अशोक शिंदेला रू. १०००/- रोख, मेडल, मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. तर सहभागी विद्यार्थ्यांना सहभागीता प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. बक्षीस वितरण समारंभाप्रसंगी दयानंद काशिनाथ असावा प्रशालेचे प्राचार्य संतोष हम्पे, दयानंद कला व विज्ञान महाविद्यालय एन.एस.एस. विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुचित्रा पाटणकर, डॉ. विजया महाजन, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे ब्रांच मॅनेजर सुगतरत्न गायकवाड, सांख्यिकी विभाग प्रमुख दिनेश राठोड, क्लस्टर प्रिव्हेन्शन ऑफिसर ब्रह्मदेव श्रीमंगले आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन समुपदेशक कपिल भालेराव यांनी केले. स्वागत ब्रह्मदेव श्रीमंगले यांनी केले. प्रास्ताविक कृष्णा सकट यांनी केले तर आभार दिनेश राठोड यांनी मानले.

# पानमंगरुळ येथे १० ऑगस्टपासून श्री राघवेंद्र स्वाति आराधना महोत्सवास प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पानमंगरुळ/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरूळ येथील श्री राघवेंद्र स्वामी मठात दि. १० ऑगस्ट २५ ते १२ऑगस्ट २५ पर्यंत श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सवास प्रारंभ होणार आहे. या तीन दिवसात धार्मिक कार्यक्रमाबरोबर प्रवचन, भजन व सांस्कृतिक संपन्न होणार आहेत.



शनिवार दि. ९ ऑगस्ट रोजी सायं. ६:३० वाजता गोपूजा, ध्वजारोहण, धान्यपूजा, लक्ष्मीपूजा व प्रार्थनोत्सव, स्वस्तिवाचन व महामंगळाराती इ.

रविवार दि. १० ऑगस्ट २५ रोजी पूर्वाराधना रोजी पहाटे ५:३० वा सुप्रभात, सकाळी ८ वाजता ग्राम प्रदक्षिणा, पालखी सेवा, सकाळी १० वा. पाद्यपूजा, अष्टोतर पारायण, दुपारी १२ वा. नैवेद्य, हस्तोदक, अलंकार, महामंगलारती व तीर्थप्रसाद, दुपारी १ वा. सुजाता देशपांडे (सोलापूर) यांचे भक्तिगीत कार्यक्रम, दुपारी २ वा. सुधामृत भजन मंडळ सोलापूर यांचे भजन कार्यक्रम, सायं. ७वा, भजन, पालखी सेवा, रथोत्सव, स्वस्तिवाचन, महामंगलारती व श्रेय प्रार्थना.

सोमवार दि. ११ ऑगस्ट मध्याराधना रोजी पहाटे ५:३० वा सुप्रभात, सकाळी ८ वाजता ग्राम प्रदक्षिणा, पालखी सेवा, सकाळी १० वा. पाद्यपूजा, अष्टोतर पारायण, पवमान होम, सकाळी ११ वाजता मध्याराधना प्रयुक्त लक्ष तुळशी अर्चना, दुपारी १२ वा. नैवेद्य, हस्तोदक, अलंकार, महामंगलारती व तीर्थप्रसाद, सायंकाळी ६ वाजता व्यंकटेश संगित विद्यालय यांचे भक्तिगीत कार्यक्रम

मंगळवार दि. १२ ऑगस्ट २५ उत्तराधना रोजी पहाटे ५ वा. सुप्रभात, सकाळी ६ वा. निर्माल्य विसर्जन, सकाळी ८ वा. पाद्यपूजा. सकाळी ९ वा. पंचामृत अभिषेक, अष्टोत्तर पारायण, सकाळी ११ वा. सामुहिक मुंज, उपनयन, दुपारी १२ वा. नैवेद्य, हस्तोदक, अलंकार, महामंगलारती, व तीर्थ प्रसाद, सायं ६.३० वा. श्री राघवेंद्र स्वामी भजन मंडळ, यांचे भजन कार्यक्रम. सायंकाळी वा. ८ वा. दयानंद होन्नाली यांचे प्रवचन होणार आहे.

तरी जास्तीत जास्त भाविकांनी या कार्यक्रमास येऊन शोभा वाढवावी, असे आवाहन श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सव मंडळाच्या वतीने करण्यात आला आहे.

# इंदापूरच्या आश्रमशाळेचे विद्यार्थी लोकशाही समजण्यासाठी लढले; काहीजण विजयी तर काहींना पराभवाचा सामना करावा लागला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : उमेदवारांचे वय ११ ते १७ वर्ष मात्र निवडणूक लढवायची या इराद्याने त्यांनी अर्ज भरले, प्रचार केला, मतदान केले, यातील काही जण पडले तर काही जण जिंकून आले. मात्र लोकशाहीची निवडणूक प्रक्रिया समजून घेण्यासाठी ते मनापासून लढल्यानेच त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट संचलित भिमाई प्राथमिक आश्रमशाळा, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले माध्यमिक आश्रम शाळा व राजमाता अहिल्याबाई होळकर निवासी कनिष्ठ महाविद्यालयात शालेय प्रतिनिधी वार्षिक निवडणुकीचे शनिवारी (दि.२) मतपत्रिकेद्वारे मतदान पार पडले.



विद्यार्थ्यांनी कृतीयुक्त व लोकशाही पद्धतीने निवडणुक अनुभवली. निवडणूक मतपत्रिकेद्वारे घेण्यात आली. या निवडणुकीत अर्ज भरणे, मतदार यादी प्रसिद्ध करणे,अर्जाची छाननी करणे, उमेदवारांना चिन्ह वाटप करणे, अर्ज मागे घेणे, प्रचार करणे ही निवडणुकीची सर्व प्रक्रिया २७ ते ३१जुलै या काळात पार पडली. केंद्राध्यक्ष, मतदान कक्ष, मतदान अधिकारी, मतदान प्रतिनिधी, सुरक्षा कर्मचारी नेमण्यात आले. शेवटी शनिवारी २ ऑगस्ट रोजी मतदान घेऊन ४ ऑगस्टला निकाल जाहीर करण्यात आला.

या निवडणुकीत इ.५ वी ते १२ वीच्या ४०० मतदारांपैकी ३३७ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.६ जागांसाठी १७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते.

शांतता व सुव्यवस्था राहावी यासाठी शाळेत विद्यार्थ्यांच्या मदतीने पोलीस तैनात करण्यात आले.

**विजयी उमेदवार पुढील प्रमाणे**

प्राथमिक आश्रमशाळा : आयुष काळे, ईश्वरी आगवणे

माध्यमिक आश्रमशाळा: यश जाधव, अंकिता ओहोळ

उच्च माध्यमिक आश्रमशाळा : दिपक चव्हाण, शुभांगी जाधव.

विजयी उमेदवारांनी इंदापूरचे माजी नगराध्यक्ष व संस्थेचे तत्कालीन दिवंगत अध्यक्ष रत्नाकर (तात्या) मखरे यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा शकुंतला (काकी) मखरे, सचिव,ड. समीर मखरे, संचालक संजय कांबळे आदी उपस्थित होते.

विजयी उमेदवारांची शालेय परिसरात मिरवणूक काढण्यात आली. त्यांचा फेटा,हार देऊन सत्कार करण्यात आला. निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याध्यापक साहेबराव पवार, प्राचार्या अनिता साळवे यांच्या स्वाक्षरीने विजयी उमेदवारांना निवडणुकीचे प्रमाणपत्र देण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अकलूज पोलीस स्टेशन कडील गुन्हे प्रकटीकरण पथकाची कौतुकास्पद कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अकलूज बस स्थानका वर प्रवासी महिलांचे दहा लाखाची सोन्याच्या बांगड्या व गंठण लंपास करणाऱ्या पुणे येथील चार महिलांना २४ तासाच्या आत अटक करून दहा लाखाचा मुद्देमाल हस्तगत केला याबाबत सविस्तर वृत्त असे की, दिनांक ०४/०८/२०२५ रोजी दुपारी ०१.३० वाजे सुमारास फिर्यादी महिला व अकलूज बस स्थानक येथून बसणे पुणे येथे जाण्यासाठी निघाले असताना बसमध्ये चढताना गर्दीमध्ये कोणीतरी अज्ञात आणि फिर्यादी यांच्या पर्समधील सोन्याच्या बांगड्या व गंठण असे अंदाजे दहा लाख रुपये किमतीचे दहा तोळे वजनाचे सोन्याचे दागिने



चोरी केले होते त्यावरून अकलूज येथील ठाणे गुरन नंबर ५४५/२०२५ बी . एन. एस ..कलम३०३(२) प्रमाणे नोंद करण्यात आले आहे.

सदर गुन्हा नोंद होतात गुन्हे प्रकटीकरण पथकाने तात्काळ अकलूज बस स्थानक ,अकलूज नगरपरिषद सीसीटीव्ही व रस्त्यावरील दुकानाचे सीसीटीव्ही कॅमेऱ्याची पाहणी केली असता चार संशयित महिला या रिक्षाने टेंभुर्णी रोडने गेल्याचे दिसून आले अकलूज ते टेंभुर्णी रोडवरील तसेच टेंभुर्णी शहरातील असे एकूण ३० ते ३५ सीसीटीव्ही कुठे ची पाहणी करून त्यांची तांत्रिक विश्लेषण करून त्याद्वारे टेंभुर्णी येथून पळून जाण्याच्या तयारीत असताना महिला नामे १) एक एकता कैलास उपाध्ये वय २४ वर्ष राहणार मेडिकल कॉलेज शेजारी बापू नगर रोड नगर कलोबर्गी सध्या राहणार वॉटर सप्लाय जवळ फुलेनगर येरवडा पुणे, २) वनिता दिनेश कांबळे वय ३५ वर्ष राहणार वॉटर सप्लाय जवळ फुलेनगर येरवडा पुणे, ३) सुनिता शाखा सकट वय ४५ राहणार वॉटर सप्लाय जवळ फुलेनगर येरवडा पुणे, ४) आरती मेघराज उपाध्ये वय ३० वर्ष राहणार वॉटर सप्लाय जवळ फुलेनगर येरवडा पुणे, यांना शतपीने ताब्यात घेऊन त्यांच्याकडे तपास केला असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली त्यांच्याकडून वर नमूद होण्यातील चोरी केलेले दहातोळे व यापूर्वी अकलूज बस स्थानकांमधून तीन वेगवेगळ्या गुन्ह्यातील चोरी केलेली चारोळी असे एकूण अंदाजे १४ लाख रुपये किमतीचे १४ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आलेली आहे, सदर महिला या सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर यापूर्वी आनंद पोलीस ठाणे, राज्य कर्नाटक, वाई पोलीस ठाणे जिल्हा सातारा, वारजे माळेवाडी, शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर असे वेगवेगळे पोलीस ठाण्यात गुन्हे नोंद आहेत.



## मनसे नेते दिलीप धोत्रे यांचा वाढदिवस उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप बापू धोत्रे सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

पंढरपूर तालुक्यातील गादेगाव येथे वृक्षारोपण व तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची वाटप त्याचबरोबर विद्यार्थ्यांना चालू घडामोडी साठी ज्ञान होय त्यासाठी जिओ टीव्ही भेट देण्यात आला.

कोर्टी येथील शंभू महादेवाला दिलीप धोत्रे यांना दिर्गावशी लाभण्यासाठी श्रेयस धोत्रे यांनी अभिषेक घालण्यात आला. गोपाळपूर येथील मातोश्री वृद्धाश्रमामध्ये मिस्टरांना भोजन देण्यात आले. तसेच पंढरपूर शहरातील गोरगरीब रिक्षा चालकांना मोफत गॅस वाटप करण्यात आले पंढरपूर येथील शेकडो रिक्षा चालकांनी एकत्र येत दिलीप बापू धोत्रे यांचा वाढदिवस साजरा केला व पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिल्या.

तसेच माढा विधानसभेचे आमदार श्री अभिजीत आबा पाटील यांनी धोत्रे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना शुभेच्छा दिल्या यावेळी ह. भ. प. मधुकर नाईकनवरे व वाढदिवसानिमित्त सकाळपासून त्यांना राजकीय सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील व मनसे कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

पंढरपूर शहरात त्यांचा वाढदिवस मोठ्या सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला.









**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**पुत्रदा एकादशी :** श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात गुलाब, झेंडू, कामिनी, आर्किट व इतर अशा एक टन फुलांपासून आरास करण्यात आली आहे. सदरची आरास श्री ज्ञानेश्वर खिलारे अप्पर जिल्हाधिकारी नाशिक यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत करून दिली आहे.

## उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड यांचा निरोप समारंभ उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला पोलीस स्टेशन, पत्रकार, व सामाजिक संघटना कडून निरोप समारंभ, व पुढील कार्यास शुभेच्छा!

उपविभागीय पोलिस अधिकारी विक्रांत गायकवाड यांचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न मंगळा उपविभागी पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड यांची बदली इचलकरंजी येथे झाली आहे सांगोला पोलीस स्टेशनच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर समिती मोहन टाऊन हॉल येथे निरोप समारंभ आयोजित करण्यात आला.

मंगळ विभागात गेल्या दोन वर्षापासून कार्यरत असलेली उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड यांनी सांगोला तालुक्यातील दोन महत्त्वाच्या निवडणुका अध्यक्ष आणि गुन्हेगारी व सामाजिक विषय अत्यंत संयम आणि शांततेने हाताळले व त्यांच्या प्रामाणिक कार्य कौशल्य शांत स्वभाव आणि संघटन कौशल्याचे सर्व सरातून कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी गायकवाड सरांनी सर्व उपस्थित आमचे आभार मानत सांगोला पोलीस व स्थानिक नागरिकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

## ॲड. बादल यादव यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे गौरव पुरस्कार दिल्ली येथे देशाचे केंद्रीय समाज कल्याण मंत्री मा रामदास आठवले यांच्या हस्ते प्रदान





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त दिल्ली ते देशाचे केंद्रीय समाज कल्याण मंत्री मा. रामदास आठवले यांच्या हस्ते लोकशाहीर आण्णाभाऊ गौरव पुरस्कार अँड बाधव यांना प्रधान करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थिती मा लाल सिंह जी आर्या साहेब, (राष्ट्रीय अध्यक्ष अनुसूचित जाती जमाती भाजपा) खासदार राज्यसभा, मा आमदार रामभाऊ गुंडले, माजी खासदार आमदार उपस्थित मोठ्या उत्साहात लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची दिल्ली येथे जयंती साजरी करण्यात आली.

## धम्मप्रसारक अविनाश कांबळे यांची रिपब्लिकन पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बौध्द धम्म चळवळीतील अग्रेसर धम्मप्रसारक अविनाश कांबळे यांची रिपब्लिकन पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आल्याची अधिकृत घोषणा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. रिपब्लिकन पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजा सरवदे राज्य कार्याध्यक्ष बाबुराव कदम आणि राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे यांनी अविनाश कांबळे यांचे अभिनंदन केले आहे.



युनायटेड बुध्दीस्ट फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष असणारे अविनाश कांबळे हे बौध्द धम्माच्या अनेक जागतीक धम्म परिषदामध्ये सहभागी झालेले आहेत.धम्म परिषद आणि धम्म चळवळीच्या प्रसारासाठी अविनाश कांबळे जगभर प्रवास करीत असतात.महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहभागातुन स्थापन झालेल्या वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुध्दीस्ट या बौध्दांच्या जागतीक शिखर संघटनेच्या स्टँडिंग कमिटीचे अविनाश कांबळे उपाध्यक्ष आहेत.केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या समवेत अविनाश कांबळे यांनी अनेक बौध्द धम्म परिषदा यशस्वी केलेल्या आहेत.धम्मदिक्षा सुवर्ण महोत्सव मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्स येथे सन २००६ साली ऐतिहासिक गर्दीत साजरा करण्यात झाला.त्या धम्मदिक्षा सुवर्ण महोत्सवाच्या संयोजनात अविनाश कांबळे यांनी महत्वाची भुमिका पार पाडली होती. नुकताच १६ डिसेंबर २०२४ रोजी मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्सवर धम्म दिक्षा महोत्सव साजरा झाला. त्यात ही अविनाश कांबळे मुख्य संयोजक होते.

बौध्द धम्म चळवळीत अविनाश कांबळे यांचे भरीव योगदान आहे.धार्मीक चळवळी सोबत राजकीय चळवळीचे काम करण्याचा अविनाश कांबळे यांनी निर्णय घेतला.बोधिसत्व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेला रिपब्लिकन पक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले देशभर चालवत आहे.त्यांचा आपल्याला अभिमान असल्यामुळे आपण ना.रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लिकन पक्षात काम करण्याचा निर्णय घेतला. माझ्यावर विश्वास ठेऊन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मला महाराष्ट्र प्रदेश रिपब्लिकन पक्षाच्या उपाध्यक्ष पदाची जबाबदारी दिल्या बद्दल त्यांचे आभार अविनाश कांबळे यांनी मानले आहे आहेत.

### पुण्यश्रलोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्याकडून पदवी प्रदान

# सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा सरकारी वकिल श्री. प्रदिपसिंग मोहनसिंग राजपूत यांना कायद्यातील डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी पदवी प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर जिल्हयाचे जिल्हा सरकारी वकिल श्री. प्रदिपसिंग मोहनसिंग राजपूत यांना पुण्यश्रलोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्याकडून Impact of divorce under section 13 of the Hindu Marriage ct, 1955 : n Empirical study in Solapur District, Maharashtra (घटस्फोटाचे म्हणजेच विवाह विच्छेदनाचे होणारे परिणाम) या विषयावर सखोल संशोधनासाठी विदयावाचस्पति -डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ही पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली आहे.



दिनांक ०२/०८/२०२५ रोजी विद्यापीठात झालेल्या मौखीक सादरीकरणात त्यांनी आपल्या संशोधनातील महत्त्वाचे निष्कर्ष मांडले आणि घटस्फोटामुळे घटस्फोटीत पती-पत्नी, घटस्फोटीतांचे मुलबाळे, घटस्फोटीतांचे माता-पिता आणि घटस्फोटीतांचे दोन्ही परिवार व समाजावर होणारे परिणाम तसेच घटस्फोटाची कारणे, घटस्फोटापूर्वी आणि घटस्फोटानंतर येणा-या अडचणी आणि त्यावर मात करण्यासाठी कायदयामध्ये आवश्यक असलेल्या सुधारणा यावर त्यांनी अभ्यासपूर्ण अशी मते मांडून, हिंदू विवाह कायदयामध्ये व इतर धर्माच्या कायदयामध्ये सध्य परिस्थितीनुसार काय सुधारणा होणे आवश्यक आहे तसेच त्याला अनुसरून घटस्फोट संबंधातील पिडीतांसाठी जलत गतीने न्याय मिळण्यासाठी कौटुंबिक न्यायालयामध्ये सध्याची असलेली परिस्थिती आणि पुढे उद्‌भवणारी परिस्थिती यामध्ये कोणत्या सोयी व सुधारणा होणे आवश्यक आहे तसेच कौटुंबिक न्यायालयाच्या कायदयामध्ये देखील घटस्फोटीतांना जलत गतीने न्याय होणेसाठी महत्त्वपूर्ण अशा सुधारणा सुचविलेल्या आहेत. ड. श्री. राजपूत यांचे सदर विषयाचे संधोधन दयानंद विधी महाविदयालयाचे माजी प्राचार्य डॉ. यु. मंगापतीराव सर आणि सध्याचे प्रभारी प्राचार्य डॉ. सोनाली गायकवाड मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण झाले.

सदर मौखीक सादरीकरणावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विदयापीठामध्ये अध्यक्ष म्हणून डॉ. श्री. वसंत कोरे तर, बाहय परिक्षक म्हणून कोल्हापूर येथील डॉ. एम.सी. शेख आणि मार्गदर्शक डॉ. सोनाली गायकवाड यांनी मौखीक सादरीकरण सादर करून घेतल, त्याचप्रमाणे सदरवेळी दयानंद महाविदयालयाचे सध्याचे व्यवस्थापन पाहणारे डॉ. श्री. उबाळे सर, दयानंद कला आणि विज्ञान महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. दामजी सर, दयानंद शिक्षणशास्त्राचे प्राचार्य डॉ. क्षिरसागर सर, दयानंद वाणीज्य महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. शिंदे सर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

ड. श्री. राजपूत यांनी सोलापूर जिल्हयाचे जिल्हा सरकारी वकील म्हणून गेली जवळपास ७ वर्षे ते काम करत आहेत, तर त्यांना फौजदारी वकिली व्यवसायाचा जवळपास ३० वर्षांचा दांडगा अनुभव असून, एवढया व्यस्ततेतून त्यांनी सदरचा संशोधन अहवाल पूर्ण करून, तो विदयापीठाकडे सादर केला आहे. सदरचे कार्य करत असताना, ड. श्री. राजपूत यांनी आजपर्यंत एकूण १०९ गुन्हेगारांना जन्मठेपेची शिक्षा तर, २ गुन्हेगारांना फाशीची शिक्षा घेतली असून, इतर अनेक गुन्हेगारांना १ वर्ष ते २५ वर्षापर्यंत शिक्षा घेण्यामध्ये त्यांनी यश मिळविले आहे, तसेच इतर अनेक गुन्हयांमधील आरोपींचे नियमित व अटकपूर्व जामीनाचे अर्ज नामंजूर करून घेतले आहेत. त्याचबरोबर ड. श्री. राजपूत हे सध्या विशेष सरकारी वकिल म्हणून पुणे जिल्हा व सत्र न्यायालय येथील महत्त्वाच्या व गाजलेल्या खटल्यामध्ये काम पाहत आहेत. त्याचबरोबरीने ते मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे देखील विशेष सरकारी वकील म्हणून काही प्रकरणात सरकारची बाजू मांडत आहेत. सदरच्या यशामुळे ड. श्री. राजपूत यांच्यावर समाजातील सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## राजापूर अकिवाट पुलावर भली मोठी मगर, शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिरोळ : राजापूर अकिवाट तालुका शिरोळ या पुलावर दिनांक ०४/०८/२०२५ रोजी रात्री ११.३० दरम्यान शेतकऱ्यांना पुलावर भली मोठी मगर रस्ता पास करताना दिसली.

भले मोठी मगर पाहून अनेक शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जवळच शेती असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

सध्या पाणी कमी झाल्यामुळे अनेक मगरी रस्त्यावर आढळून येत आहेत.










# गुप्त पद्धतीने गर्भलिंग करणाऱ्या केंद्रावर धाडी टाकाव्यात : प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम

## एड्स प्रतिबंध, लिंग निवड प्रतिबंध आणि तंबाखू नियंत्रणासाठी जिल्हा समित्यांची संयुक्त बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : गर्भधारणा पूर्व व प्रसव-पूर्व निदान तंत्रे (झउझछउ्ढ) अंतर्गत लिंग निवडीस प्रतिबंध करण्यासाठी जिल्ह्यातील गुन्हे दाखल प्रकरणांचा आढावा घेण्यात आला. गुप्त पद्धतीने गर्भलिंग निदान करणाऱ्या केंद्रांवर धाडी टाकण्याचे आदेश आरोग्य यंत्रणेला देऊन सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करण्याचे निर्देशही प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिले.




जिल्ह्यातील एडस् प्रतिबंध, लिंग निवड प्रतिबंध आणि तंबाखू नियंत्रणासाठी जिल्हा दक्षता समिती व जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जगम यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहात पार पडली. या बैठकीस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, जिल्हा नोडल अधिकारी डॉ. अभय शिंदे तसेच स्त्रीभ्रूण हत्येविरोधात कार्यरत स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रभारी जिल्हाधिकारी श्री. जंगम यांनी एडस् बाधित रुग्णांना वेळेवर औषधे मिळत आहेत का याचा आढावा घेतला. औषधांच्या तुटवड्याबाबत माहिती घेतली आणि जनजागृतीसाठी जिल्ह्यात शिबिरे घेण्याच्या सूचना दिल्या. शासनाच्या सुविधा कमीत कमी कागदपत्रांवर उपलब्ध करून देण्याचे निर्देशही दिले.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाच्या अनुषंगाने शाळा, महाविद्यालये, रेल्वे स्टेशन, बसस्थानक, गॅरेज आदी ठिकाणी फलकाद्वारे जनजागृती करण्याचे निर्देश श्री जंगम यांनी देऊन तंबाखू व गुटखा विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबतही त्यांनी आदेशित केले.

प्रारंभी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने यांनी पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत सुरू असलेल्या कामकाजाची माहिती बैठकीत दिली.

# आई बाबा फाऊंडेशनच्या वतीने टाटा आणि केईएम रुग्णालय येथे अन्नदान वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : आई बाबा फाऊंडेशनच्या वतीने आज मुंबईतील टाटा रुग्णालय आणि केईएम रुग्णालय येथे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना मोफत अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. फाऊंडेशनचे प्रमुख योगेश मौर्य यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी दोन हजारहून अधिक रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना अन्नदान करण्यात आले. फाऊंडेशनचे सहकारी जितेंद्र तावरे आणि रोनाव रामगुडे यांच्या वाढदिवसा निमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वाढदिवशी कोणताही केक एन कापता रुग्णांना व गरजूंना अन्नदान हे श्रेष्ठ दान असल्याचे सांगत दरवर्षी फाऊंडेशन मधून प्रत्येक सदस्य वाढदिवशी सामाजिक उपक्रम घेत असल्याचे फाऊंडेशनचे अध्यक्ष योगेश मौर्य यांनी सांगितले.




# प्रथम वर्ष इंजिनिअरिंगच्या कॅप राऊंड-२ चे ऑप्शन्स भरण्याची प्रकिया ५ ऑगस्ट पासून

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'शै.वर्ष २०२५-२६ मध्ये प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेशाच्या पहिल्या फेरीचा विचार केला असता नेहमीप्रमाणे याही वर्षी स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) ला विद्यार्थी व पालकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. विद्यार्थी व पालकांनी स्वेरीतील विद्यार्थ्यांचे वार्षिक परीक्षांचे निकाल, कॅम्पस प्लेसमेंट मधून निवड होणाऱ्या विद्यार्थांची वाढती संख्या, शैक्षणिक व संशोधनाचे वातावरण, मिळालेली मानांकने, उपलब्ध सोयी-सुविधा, उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग या गोष्टींचा प्रामुख्याने विचार केलेला दिसत आहे. एकूणच 'स्वेरीत प्रवेश मिळणे ही काळाची गरज' असल्याचे पालकांनी व विद्यार्थ्यांनी आ-ेळखले आहे हेच दिसून येते. असे असतानाही अनेक विद्यार्थ्यांना चुकीचे निर्णय, अयोग्य ब्रँचची निवड व सीईटीचा स्कोअर यामुळे स्वेरी महाविद्यालय मिळाले नाही असे असताना विद्यार्थ्यांना मंगळवार,दि. ०५ ऑगस्ट ते गुरुवार दि.०७ ऑगस्ट २०२५ रोजी होणाऱ्या दुसऱ्या कॅम्र राउंड द्वारे संधी उपलब्ध झाली आहे.' असे प्रतिपादन अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता डॉ. करण पाटील यांनी केले.

पहिल्या कॅम्र राऊंड नंतर स्वेरीमध्ये फारशा जागा शिल्लक राहत नाहीत हा इतिहास आहे. याच पार्श्वभूमीवर स्वेरीच्या पदवी अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता डॉ.करण पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले. 'शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रथम वर्ष पदवी इंजिनिअरिंग प्रवेशाची दुसरी फेरी (सेकंड कॅम्र राऊंड) चे ऑप्शन फॉर्म भरण्याची प्रक्रिया येत्या मंगळवार, दि.०५ पासून ते गुरुवार, दि.०७ ऑगस्ट २०२५ हे तीन दिवस चालणार आहे. ज्यांना पहिल्या फेरीत प्रवेश मिळाला नाही व ज्यांनी पहिल्या फेरीत नॉट फ्रीझ/बेटरमेन्ट केले आहे त्यांना या दुसऱ्या फेरीचा लाभ घेता येणार आहे. सन २०२५-२६ च्या पदवी अभियांत्रिकीच्या प्रवेशाकरीता यापूर्वीच ऑनलाईन रजिस्ट्रेशन फॉर्म भरणे, भरलेले अर्ज स्विकारुन कागदपत्रांची तपासणी, पडताळणी, अर्ज निश्चित करणे आदी प्रक्रियानंतर पहिल्या प्रवेश फेरीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. पहिल्या फेरीत योग्य महाविद्यालय अथवा योग्य ब्रँच मिळाली नसेल अथवा कुठेच प्रवेश मिळाला नसेल अशा विद्यार्थ्यांसाठी दुसऱ्या फेरीतून संधी उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे योग्य महाविद्यालय व योग्य ब्रँच याबाबतचे पसंतीक्रम ऑनलाईन भरावे लागणार आहेत. यासाठी मागे झालेल्या चूका टाळून व कट ऑफ चा पूर्णपणे अभ्यास करून कॅम्र राऊंड-२ चे ऑप्शन फॉर्म भरणे आवश्यक आहे. 'पालक व विद्यार्थ्यांनी महाविद्यालय निवडताना महाविद्यालयात दरवर्षी होणारे प्रवेश, विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल, कॅम्पस प्लेसमेंटची संख्या, कॅम्पस मधून मिळणारे संस्कार, शैक्षणिक वातावरण, सोयी-सुविधा, उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग या बाबींचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यास करून करिअरच्या दृष्टीने योग्य महाविद्यालयाची निवड करणे अत्यंत गरजेचे आहे. दुसऱ्या प्रवेश फेरीची जागावाटप (अलॉटमेंट) यादी अधिकृत संकेतस्थळावर सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसिद्ध होणार आहे. दुसऱ्या प्रवेश फेरीच्या जागावाटप (अलॉटमेंट) नंतर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन मंगळवार, दि.१२ ऑगस्ट ते गुरुवार, दि.१४ ऑगस्ट २०२५ रोजी दु. ३:०० वाजेपर्यंत आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरून प्रवेशाची निश्चिती करावी लागेल. स्वेरी अभियांत्रिकीच्या स्क्रुटनी सेंटर (एस.सी.क्रमांक-६२२०) मध्ये ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची मोफत सोय केली असून प्रथम वर्ष पदवी इंजिनिअरिंगच्या प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता डॉ. करण पाटील (९५९५९२११५४) व प्रा.उत्तम अनुसे (९१६८६५५३६५) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. स्वेरीचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली उच्च शिक्षित प्राध्यापक वर्गाच्या सहकार्याने नव्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी स्वेरी महाविद्यालय सज्ज झाले आहे.




# महसूल दिन सप्ताहात निफाड तहसील कार्यालयात अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महसूल दिन सप्ताह निमित्त निफाड तहसील कार्यालयात सोमवार दि ४ ऑगस्ट रोजी सत्कार समारंभ पार पडला. महसूल विभागाच्या कार्यक्षमतेत मोलाचे योगदान देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा या कार्यक्रमात विशेष सत्कार करण्यात आला. उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांच्या अध्यक्षतेखाली व तहसीलदार श्री. विशाल नाईकवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.




कार्यक्रमात महसूल विभागातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. यात निवडणूक नायब तहसीलदार श्री राहुल मुळीक, मंडळ अधिकारी श्री ज्ञानेश्वर पगार, तलाठी श्री राहुल अहिरे, श्री नितेश निंबाळकर, अव्वल कारकून श्रीम वैशाली हिंडे, महसूल सहायक विजय चव्हाण व , गणेश कुमावत यांचा यामध्ये समावेश होता. मागील वर्षभरात क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात बहुमोल कामगिरी बजावणाऱ्या श्री शंकर खडांगळे, प्रसाद देशमुख, लक्ष्मीकांत शिंदे , दिपक पवार, प्रफुल्ल गवळी यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घेत त्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमात डॉ. शशिकांत मंगरुळे यांनी आपल्या भाषणात महसूल विभागाच्या कार्यपद्धतीत झालेल्या सकारात्मक बदलांबद्दल समाधान व्यक्त केले. निफाड तालुका महसूल कामकाजाच्या दृष्टीने सातत्याने प्रगती करत आहे. पारदर्शकता, तत्परता आणि जनसेवेचा दृष्टिकोन ठेवून काम करणं हीच आपल्या विभागाची ओळख व्हावी, असे त्यांनी सांगितले.

तहसीलदार श्री. विशाल नाईकवाडे यांनी आपल्या मनोगतातून,महसूल दिन सप्ताह हा केवळ एक औपचारिकता नसून, हा आपल्या कामाचा आढावा घेण्याचा आणि उत्तम कामगिरी करणाऱ्यांना प्रेरणा देण्याचा एक उपक्रम आहे,असे सांगत सर्व सहकाऱ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे संयोजन तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्तम प्रकारे केले होते. यावेळी विभागातील अनेक अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

हा गौरव सोहळा उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला असून, महसूल विभागाच्या अधिक गुणवत्तापूर्ण कार्यासाठी एक सकारात्मक पाऊल ठरला आहे.

## स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांचे विचार

## माईर्स एमआयटी शिक्षण संस्थेचा ४३ वा स्थापनादिन संपन्न

# व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास हेच खरे शिक्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : शिक्षणाचा प्रचार व प्रसार करत असताना त्याचे प्रयोजन काय आहे, हा चिंतनाचा मुद्दा आहे. शिक्षणाचा केंद्रबिंदू व्यक्ती असून त्याचा सर्वांगीण विकास हेच मुख्य प्रयोजन असावे. असे विचार श्रुतिसागर आश्रम फुलगाव चे संस्थापक स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांनी व्यक्त केले.






माईर्स एमआयटी शिक्षणसंस्था समूहाचा ४३ व्या स्थापनादिनाच्या समारंभात मुख्य पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. संजय देशमुख होते. तसेच गरीबे इन्स्टिट्यूट फॉर सॉफ्ट पॉवर अँड पब्लिक डिप्लोमसी यूएसचे संस्थापक आणि ग्रॅमी पुरस्कार विजेते प्रा. फर्नांडो गरिबे , गरिबे इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष रोनाल्ड सी. गुनेल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

तसेच माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष, विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, संस्थापक विश्वस्त प्रा. प्रकाश जोशी, अध्यक्ष डॉ. मंगेश कराड, विश्वस्त व सचिव प्रा. स्वाती कराड - चाटे, विश्वस्त डॉ. विनायक घैसास, एमआयटी डब्ल्यूपीयू चे कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस उपस्थित होते.

या प्रसंगी डॉ. संजय उपाध्ये लिखित आणि प्रा. शशांक दिवेकर प्रस्तुत गीत विश्वनाथ, विश्वधर्मी विश्वनाथ शोध विश्वशांतीचा: यात्रा वचनपूर्तीची हा कार्यक्रम झाला.

स्वामी स्वरूपानंद सरस्वती म्हणाले, शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा, बुद्धीचा आणि मनाचा विकास झाला तर सामाजिक स्वास्थ्य अबाधित राहील. मनाची मशागत करणारी मूल्याधिष्ठित शिक्षण पद्धती आवश्यक असून व्यक्तिमत्वाचा विकास हेच खरे शिक्षण ठरू शकेल

प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, मूल्याधिष्ठित नागरिक घडावा या विचारातून ही शिक्षण संस्था कार्यरत आहे. अध्यात्म आणि विज्ञानाच्या समन्वयातून जगात शांती नांदेल. विश्वशांतीसाठी मानवतावादाचे वैश्विक सिद्धांत विद्यार्थ्यांमध्ये रुजावे यासाठी ही संस्था प्रयत्नशील आहे.

प्रा. फर्नांडो गरिबे म्हणाले, सध्याचे जग जिथे विसंगती आणि मतभेदांना तोंड देत आहे. अशावेळी आंतरिक ज्ञानाचा शोध घेणे हे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञानाबरोबर आंतरिक ज्ञानाचा शोध घ्यावा व वैश्विक मानवता जागवावी.

संजय देशमुख म्हणाले, विश्वशांतीचा मंत्र देणारे संत ज्ञानेश्वर महाराज यांनी पसायदानातून विश्वबंधुत्वाचा मार्ग दाखविला आहे. ही शिक्षणसंस्था पसायदानाचा वैश्विक विचार शिक्षणाच्या माध्यमातून नव्या पिढीमध्ये रुजविण्याचे महत्वपूर्ण कार्य करीत आहे.

माईर्सचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल कराड यांनी दृकश्राव्य माध्यमातून संस्थेच्या कार्याचा आढावा सांगितला.

यानंतर माईर्स शिक्षण संस्था समूहातील विविध शाखांमधील उल्लेखनीय सेवा देणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मानपत्र व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच, संस्थेचा माजी विद्यार्थी म्हणून जागतिक स्तरावर केलेल्या रचनात्मक कार्यासाठी माईर्स शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष व विश्वस्त डॉ. सुनिल कराड यांना गोल्डन हॉल ऑफ फेम अवॉर्ड मोस्ट प्रिव्हियस ज्वेल्स ऑफ नॉलेज डिवाइन अँड युनिक पर्ल्स ऑफ विस्डम ने सन्मानित करण्यात आले.

ॉ. मंगेश कराड यांनी प्रास्ताविक केले.प्रा. स्वाती कराड चाटे यांनी आभार मानले व डॉ. रत्नदीप जोशी यांनी सूत्रसंचालन केले.